# कल्याण वाहतूक उप विभागाचे हद्दीत निर्गमित करण्यात आलेली वाहतूक नियंत्रण अधिसूचना

पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर
तीन हात नाका, एल.बी.एस.मार्ग, नौपाडा, ठाणे (पश्चिम)
दुरध्वनी क्रमांक – ०२२–२५४०१०५६
Email ID – cp.thane.dcptraffic@mahapolice.gov.in

जा.क्र. पोउपआ/वावि/अधिसूचना/ २०९ /२०२५ दि. २७/०८/२०२५

## —: वाहतूक नियंत्रण अधिसूचना :—

**ज्याअर्थी, कल्याण** वाहतूक उप विभागाचे हद्दीत दिनांक २७/०८/२०२५ ते दि.६/९/२०२५ रोजी पावेते सार्वजनिक गणेशोत्सव साजरा होणार आहे. दिनांक २८/०८/२०२५ रोजी (दिड दिवसाचे विसर्जन), दिनांक ३१/०८/२०२५ (पाच दिवसाचे गणपती विसर्जन), दिनांक ०२/०९/२०२५ रोजी (गौरी विसर्जन व सात दिवसाचे), दिनांक ०३/०९/२०२५ (सार्वजनिक गणेशोत्सव मेळा संघ), दिनांक ०४/०९/२०२५ रोजी (९ दिवसाचे विसर्जन), दिनांक ०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी विसर्जन) शहरात गणपती विसर्जन होणार. सदर कालावधीत नमूद विसर्जन मार्गावर व मिरवणूक मार्गावर वाहतूक कोंडी होऊ नये व परिसरातील वाहतूक सुरळीत व सुनिश्चित राहणे आम जनतेच्या सोईसाठी आवश्यक आहे.

**त्याअर्थी,** मी, **पंकज शिरसाट, पोलीस उप आयुक्त, वाहतूक विभाग, ठाणे शहर** म्हणून, मला महाराष्ट्र शासन गृहविभाग क्र. एम.व्ही.ए.–११६/सीआर/३७/टीआर, दि. २७/०९/१९९६ चे अधिसूचनेनुसार मोटार वाहन कायदा कलम ११५, ११६ (१)(अ)(ब) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकाराचा वापर करून पुढीलप्रमाणे अधिसूचना जारी करीत आहे. :—

**NO PARKING ZONE –** **१)** आधारवाडी सर्कल ते दुर्गामाता चौक, सहजानंद चौक ते दुर्गामाता चौक तसेच दुर्गामाता चौक ते उर्दु स्कूल दरम्यान संपूर्ण रस्ता सर्व प्रकारच्या वाहनांसाठी **NO PARKING ZONE** करण्यात येत आहे.

**पर्यायी मार्ग –**

**अ)** कोनगाव कडून दुर्गाडी मार्गे कल्याण शहराचे दिशेने येणारी सर्व प्रकारची हलकी वाहने ही वाडेघर चौक/आधारवाडी चौकातून (दुर्गाडी चौक व परिसरातील मार्गावर गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुकांमुळे रहदारीची कोंडी झाल्यास) इच्छित स्थळी जातील.

**ब)** कोळशेवाडी कडून कोनगाव दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने गोविंदवाडी बायपास नाक्यावरून डावीकडे वळून गोविंदवाडी मार्गे इच्छित स्थळी जातील.

**क)** कोनगाव बाजूकडून डोंबिवली – मानपाडा – कल्याण फाटा – शिळफाटा दिशेने जाणारी सर्व हलकी वाहने दुर्गाडी चौक येथे उजवे वळण घेवुन दुर्गाडी – गोविंदवाडी बायपास मार्गाने इच्छित स्थळी जातील.

**ड)** कोनगाव गणेश घाट व दुर्गाडी गणेश घाट येथील गणेश मूर्ती विसर्जन मिरवणुकांमुळे रहदारीची कोंडी झाल्यास या मार्गावरील वाहतूक पर्यायी मार्ग म्हणुन कल्याण शहरातून गांधारी पूल मार्गे येवई नाका कडे व कल्याण कडे येण्यासाठी येवई नाक्यावरून गांधारी पूल मार्गे इच्छित स्थळी जातील.

**<u>जड अवजड वाहने व सार्वजनिक व खाजगी बसेस यांना कल्याण शहरात प्रवेश बंद</u>** :—

**१)** कल्याण शहरांतर्गत मार्गावरून जड अवजड वाहनांचे वाहतुकीस मूर्ती विसर्जनाचे दिवशी सकाळी ०८:०० वा. पासून गणेश मूर्ती विसर्जन कार्यक्रम संपेपावेतो पूर्णपणे मनाई करण्यात येत आहे.

**२)** कल्याण शहरात येणाऱ्या सर्व प्रकारच्या सार्वजनिक बसेस (के.डी.एम.टी., एन.एम.एम.टी., राज्य परीवहन एस.टी.बसेसे ) व खाजगी बसेस यांना **दुर्गाडी, लाल चौकी, छत्रपती शिवाजी महाराज चौक** मार्गे **'प्रवेश बंद'** करण्यात येत असून सदर बसेस गोविंदवाडी बायपास पत्रीपूल, वल्लीपीर चौक, गुरूदेव हॉटेल मार्गे कल्याण स्टेशन व कल्याण एस. टी. आगार येथे जातील व त्याच मार्गे इच्छित स्थळी जातील.

**३)** मुरबाड रोडने येणाऱ्या बसेस यांना **प्रेम ऑटो सर्कल** येथे **'प्रवेश बंद'** करण्यात येत असून सदर बसेस या प्रेम ऑटो, बिर्ला कॉलेज रोड, दुर्गाडी, गोविंदवाडी बायपास, पत्रीपूल, वल्लीपीर चौक गुरूदेव हॉटेल मार्गे कल्याण स्टेशन व कल्याण एस. टी. आगार येथे जातील व त्याच मार्गे इच्छित स्थळी जातील.

सदर वाहतूक नियंत्रण अधिसूचना **दि. २८/०८/२०२५ रोजी (दीड दिवसाचे), दि. ३१/०८/२०२५ रोजी (पाच दिवसाचे), दि. ०२/०९/२०२५ रोजी (गौरी गणपती व सात दिवस), दिनांक ०३/०९/२०२५ (सार्वजनिक गणेशोत्सव मेळा संघ), दिनांक ०४/०९/२०२५ रोजी (९ दिवसाचे विसर्जन), दिनांक ०६/०९/२०२५ (अनंत चर्तुदशी विसर्जन)** या कालावधीत **सकाळी ११.०० वा. ते गणपती विसर्जन मिरवणूक कार्यक्रम संपेपर्यंत अंमलात राहील.**

सदर वाहतूक अधिसूचना पोलीस वाहने, फायर ब्रिगेड, रूग्णवाहिका, गणेश मूर्ती विसर्जनातील वाहने व इतर अत्यावश्यक सेवेतील वाहनांना लागू होणार नाही.

**( पंकज शिरसाट )**
पोलीस उप आयुक्त,
वाहतूक विभाग, ठाणे शहर

**प्रति,**

जिल्हा माहिती अधिकारी, जिल्हा माहिती अधिकारी कार्यालय, ठाणे.

२/– सदर अधिसूचना प्रसिध्द करण्यास विनंती आहे.

**प्रत माहितीसाठी सादर** :–

मा. पोलीस आयुक्त, ठाणे शहर

मा. पोलीस सह आयुक्त, ठाणे शहर

मा. अपर पोलीस आयुक्त, पूर्व प्रादेशिक विभाग, ठाणे शहर

मा. जिल्हाधिकारी, ठाणे

मा.आयुक्त, कल्याण डोंबिवली व उल्हासनगर महानगरपालिका

**प्रत कार्यवाहीसाठी** :–

उप प्रादेशिक परिवहन अधिकारी, कल्याण

विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य परिवहन, ठाणे/भिवंडी/कल्याण/विठ्ठलवाडी

पोलीस उप आयुक्त, परिमंडळ–३, कल्याण, परिमंडळ–४, उल्हासनगर व विशेष शाखा, ठाणे

**प्रत** :– पोलीस उप आयुक्त, आर्थिक गुन्हे, ठाणे शहर

२/– सदर अधिसूचना नागरीकांच्या माहितीसाठी ठाणे शहर पोलीस वेबसाईटवर प्रसिध्दी होणेस विनंती आहे.

**प्रत** :– समन्वय अधिकारी, ९ ए.एस.कक्ष, ठाणे

२/– सदर अधिसूचना पोलीस नोटीसमध्ये प्रसिध्दीसाठी

**प्रत** :– सपोआ कल्याण, उल्हासनगर वाहतूक विभाग प्रभारी अधिकारी, कल्याण, कोळसेवाडी, उल्हासनगर, विठ्ठलवाडी वाहतूक उपविभाग, ठाणे ाहर

२/– म.न.पा.कल्याण–डोंबिवली च्या संबंधीत अधिकाऱ्यांकडून आवश्यक सूचना फलक लावून घ्यावीत.